# महाराष्ट्र शासन

क्र. विभशा-२०१८/प्र.क्र.१५/विजाभज- २
विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक:- १३/०३/२०१९

प्रति,

१. संचालक, विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे.
२. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (सर्व)
३. सहायक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय :- शासनाची परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना रद्द करुन जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यासंबंधी मा. उच्च न्यायालय मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल रिट याचिकांमध्ये शपथपत्र दाखल करण्याबाबत.

संदर्भ:-. सरकारी वकील मा उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे पत्र दि.०५.१०.२०१८

उपरोक्त न्यायालयीन प्रकरणाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, राज्य शासनाची नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना रद्द करुन जुनी सेवानिवृत्ती योजना लागू करण्यासंबंधी मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद खंडपीठ येथे अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. यापैकी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र.३६९२/२०१७ मध्ये दि.१०/०७/२०१७ रोजी सदर योजनेंतर्गत कर्मचाऱ्यांकडून करण्यात येणारी वसूली थांबविण्याचे अंतरीम आदेश मा.उच्च न्यायालयानेदिले आहेत.

सदर योजनेविरूद्ध विजाभज आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांनीही विविध न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांमध्ये (याचिका क्र.१०३३१/२०१७ व इतर याचिका) वर नमुद केलेला दि.१०/०७/२०१७ रोजीचा अंतरीम आदेश याही प्रकरणांमध्ये लागू केलेला आहे.

सदरहू याचिकेमध्ये दि.०५.१०.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार संबंधित सरकारी वकील यांनी संदर्भीय पत्रानुसार वित्त विभागाशी संबंधित असलेल्या काही मुद्यांची माहीती मागीतलेली होती. यानुसार सदरहू प्रकरणी वित्त विभागाने याबाबत आपले अभिप्राय विभागास दिलेले आहेत. सदरहू अभिप्राय खालील प्रमाणे आहेत:-

१. केंद्र शासनाने त्यांच्या सेवेमध्ये दि.१.१.२००४ रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना म्हणजेच "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" शासन अधिसूचना,वित्त

मंत्रालय , आर्थिक कार्य विभाग, दि.२२.०१२.२००३ अन्वये लागू केली आहे.केंद्र शासनाने असेही जाहीर केले आहे की, राज्य शासनानेदेखील वर उल्लेखलेल्या नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजनेमध्ये सहभागी होण्याचा विकल्प उपलब्ध असेल.त्याचप्रमाणे या योजनेंतर्गत निवृत्तीवेतन निधीचे स्थापन व विनियमन करण्यासाठी एका स्वतंत्र "निवृत्तिवेतन विनियामक व विकास प्राधिकरणाची" स्थापना केंद्र शासनाने केली आहे. केंद्र शासनाच्या नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेत दि.१.११.२००५ नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे.

२. दि.१.११.२००५ नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन राज्याच्या एकत्रित निधीमधून देण्यात येते. शासकीय कर्मचाऱ्यास सर्वसाधारणपणे नियत वयोमान पूर्ण होताच किंवा त्यानंतर नवीन निवृत्तवेतन योजनेच्या स्तर -१ मधून बाहेर पडता येईल.तथापि,या योजनेतून बाहेर पडताना शासकीय कर्मचाऱ्यास त्याच्या खाती जमा झालेल्या एकूण रकमेच्या ४०% रक्कम ( निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाकडून नियंत्रत केल्या जाणाऱ्या जीवन विमा कंपनीकडून ) वा र्षिक ( Annuity) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य असेल. शासकीय कर्मचाऱ्याच्याबाबतीत उपरोक्त वा र्षिकीमधून,संबंधित कर्मचारी तसेच सेवानिवृत्तीच्यावेळी त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे आई-वडिल आणि त्याची /तिचा यथास्थिती पत्नी /पती यांना हयातभर निवृत्तीवेतर देण्याची व्यवस्था केली जाईल.शासकीय कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली उर्वरित रक्कम "ठोक रकमेच्या स्वरूपात" संबंधीत शासकीय कर्मचाऱ्यास प्रदान केली जाईल व तिचा विनियोग कोणत्याही प्रकारे करण्याचे स्वातंत्र्य त्यास असेल.

३. निवृत्तीवेतन विषयक दायित्वाचा राज्य शासनाच्या तिजोरीवर सातत्याने पडणारा आर्थिक भार वाढत असून जुनी निवृत्तीवेतन योजना ख र्चिक ठरत असल्यामुळे राज्य शासनाच्या सेवेत दि.१.११.२००५ नंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना "नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना" लागू करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय शासनाने मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतला आहे. हा निर्णय केंद्र शासनाच्या धर्तीवर घेण्यात आला आहे. राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार नवीन योजनेकरिता राज्य शासन केंद्र शासनास सामिल झाले असून या योजनेंतर्गत जमा असलेली रक्कम केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाही झाली आहे.

४. शासन निर्णय वित्त विभाग दिनांक २७/०८/२०१४ अन्वये महाराष्ट्र शासन केंदाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होईल असा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे राज्यांच्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेचे नामकरण राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना असे करण्यात आले आहे. त्यामुळे दि.१.११.२००५ पासून सुरू असलेली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना शासन निर्णय वित्त विभाग दि.६.४.२०१५ अन्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट करून अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

५. भविष्य निर्वाह निधीमध्ये ज्याप्रमाणे शावश्यकता असल्यास परतावा किंवा ना-परतावा रक्कम काढता येते. त्याचप्रमाणे राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली अंतर्गत सभासदांना निवृत्तीवेतन निधी विनियम आणि विकास प्राधिकरण ( PFRDA) यांचे परिपत्रक क्रमांक PFRDA/२०१८/४०/EXIT, दि.१०.०१.२०१८ अन्वये PARTIAL WITHDRAWAL ची सुविधा उपलब्ध असून सभासदांच्या संपूर्ण सेवा कालावधीत तीन वेळा जमा रक्कमेच्या २५% च्या मर्यादेत रक्कम काढण्याची तरतूद आहे.

यास्तव याचिका क्र.१०३३१/२०१७ व इतर याचिकांमध्ये वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायाचा अंतर्भाव करून सदरहू प्रकरणी मा. न्यायालयामध्ये दाखल झालेल्या सर्व याचिकांमध्ये शपथपत्र दाखल करण्याकरीता सर्व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण / सर्व सहायक आयुक्त समाज कल्याण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणी समान विषयामध्ये मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल याचिकांमध्ये याप्रमाणेच शपथपत्र दाखल करण्याकरीता सर्व संबंधित प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण / सर्व सहायक आयुक्त समाज कल्याण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. (मसुदा सोबत जोडला आहे.)

सदरहू न्यायालयीन प्रकरणांमध्ये तात्काळ शपथपत्र दाखल करावे व केलेल्या कार्यवाहीबाबत मा.उच्च न्यायालयास व शासनास उलट-टपाली अवगत करावे.

(कि.आ.फुलझेले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

माहितीस्तव सादर,

१.प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक

२. निवडनस्ती- विजाभज-२

C:\Users\suresh.sakat\Desktop\court-२०१८\१०३३१.docx